# जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर
## (मगांराग्रारोहयो शाखा)

जिल्हाधिकारी कार्यालय, पार्श्वनाथ ९, बिडको नाका, जिल्हा-पालघर पिनकोड-४०१४०४
दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२९७२७१
Email ID : nregapalghar@gmail.com

क्र.मगांराग्रारोहयो/टे-१/आस्था/कंत्राटी पदभरती/कावि- /२०१७ दिनांक : ०७/०१/२०१७

**प्रति,**

**जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी,**
**NIC पालघर**
**जिल्हा पालघर**

**विषय :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कंत्राटी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व कंत्राटी तांत्रिक अधिकारी या पदाच्या नियुक्तीचा निकाल प्रसिध्द करण्याबाबत**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, पालघर अंतर्गत कंत्राटी तत्त्वावर सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व तांत्रिक अधिकारी या पदासाठी पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी दिनांक ०४/०१/२०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे उमेदवारांची थेट मुलाखत (Walk-in-Interview) घेण्यात आली. सदर मुलाखतीमध्ये निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी व निवड करण्यात आलेले उमेदवार हजर न झाल्यास तसेच भविष्यात रिक्त होणाऱ्या पदांवर प्रतिक्षाधीन यादीतील निवड करुन ठेवण्यात आलेल्या उमेदवारांची यादी व उमेदवारांना मिळालेल्या गुणांचा तक्ता यासोबत जोडण्यात येत आहे.

सदरच्या निकालास मा.जिल्हाधिकारी पालघर यांच्या www.collectorpalghar.in या संकेतस्थळावर दिनांक ०७/०१/२०१७ ते १४/०१/२०१७ रोजी पर्यंत प्रसिध्दी देण्यात यावी.

संकेतस्थळावरील प्रसिध्दीबाबतचा अहवाल या कार्यालयास कळविण्यात यावा, ही विनंती.

**(उमेश बिरारी)**
**उपजिल्हाधिकारी (रोहयो)**
**पालघर**

**मा.जिल्हाधिकारी पालघर**
**यांचे मान्यतेने**